# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

**दिनांक ३०/०७/२०२२ (शनिवार)**

**(सायंकाळ)**

---

## अवैध गौण खनिज (रेती) वाहतुकीवर
## —: स्थानिक गुन्हे शाखा नागपूर जिल्हा ग्रामीण ची कार्यवाही :—

स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणचे पथक दिनांक २९.०८.२०१९ चे रात्री ला रामटेक उपविभागात अवैध धंदयांवर आढा घालणेकामी पोस्टे रामटेक हद्दीत पेट्रोलींग करीत असता खात्रीशिर माहिती मिळाली की, तुमसर ते मनसर किटस् महाविद्यालय समोरून टिप्पर ने अवैधरित्या बिनापरवाना रेती (गौणखनिज) ची चोरटी वाहतुक होत आहे अशा माहितीवरून किटस् महाविद्यायल समोर नाकाबंदी करीत असतांना टिप्पर क्र. एमएच ४९—०६९९ व टिप्पर क्र. एमएच ३६ एए २७९१ ला थांबवुन विचारपुस केली असता त्याचे ताब्यात कोणत्याही प्रकारचे कागदपत्र नसुन ते टिप्पर क्र. एमएच ४९—०६९९ चा मालक अजय लाहणे रा.लेभ त. तुमसर जिल्हा भंडारा व टिप्पर क्र. एमएच ३६ एए २७९१ दिनेश ढोके रा. तुमसर जिल्हा भंडारा यांच्या सांगणेवरून आपले ताब्यातील टिप्पर चे डाल्यांमध्ये अवैधरित्या विनापरवाना विनारॉयल्टी रेती (गौणखनिज) शासनाचे महसुल बुडवित चोरटी वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातुन वरील नमुद टिप्पर प्रत्येकी २,००,०००/— रू व दोन्ही टिप्पर चे डाल्यामध्ये प्रत्येकी टिप्परमध्ये अंदाजे ४ ब्रास रेती प्रमाणे ८ ब्रास रेती कि. ३२,०००/— रू. असा एकुण ४०,३२,०००/— रू चा माल जप्त करण्यात आली असुन दोन्ही टिप्पर मध्ये शासनाने ठरवुन दिलेल्या वजनापेक्षा जास्त माल लोड केलेला असल्याचे शंका आल्याने रामटेक ते मौदा रोड वरील साईबाबा सोलवेनी इन्डस्ट्री लि. येथील वजन काटयावर केले असता टिप्पर क्र. एमएच ४९—०६९९ चे एकुण वजन ३७,७०० कि.ग्रॅ. व टिप्पर क्र. एमएच ३६ एए २७९१ चे एकुण वजन ४२,६६० कि.ग्रॅ. असे मिळुन आल्याने आरोपी १)चालक माधवराव संपत नेवारे वय ३५ वर्षे, रा. डोंगरी (बुजरूक)ता. तुमसर जिल्हा भंडारा व आरोपी २) चालक अरविंद पांडुरंग शेंडे वय २८ वर्षे, रा. मु.पो. मोहगाव (देवळी) ता. मोहाडी जि.भंडारा यांना पुढील कार्यवाही करीता पोस्टे रामटेक यांचे ताब्यात देवुन त्यांच्या विरूध्द कलम ३७९, १०९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणिकर यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे यांचे मार्गदर्शनात सहा.पोलीस उपनिरीक्षक चंद्रशेखर गडेकर, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, पोलीस नाईक रोहण डाखोरे, अमोल वाघ, अमोल कुथे यांचे पथकाने पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर